## थोडक्यात

### बिभव कुमार यांना सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर

नवी दिल्ली : आम आदमी पक्षाच्या खासदार स्वाती मालीवाल मारहाण प्रकरण संपूर्ण देशभरात गाजलं होतं. याबाबतची मोठी अपडेट समोर आली आहे. या प्रकणात अटक करण्यात आलेल्या बिभव कुमार यांना सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. विभव कुमार हे दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचे पीए आहेत. खासदार स्वाती मालीवाल यांच्यासोबत गैरवर्तन केल्याचा आरोप बिभव कुमार यांच्यावर होता. या प्रकरणी त्यांना पोलिसांकडून अटक करण्यात आली होती, मात्र आता सर्वोच्च न्यायालयाने बिभव कुमार यांना काही अटींसह जामीन मंजूर केला आहे.

### सेबी अध्यक्षांना एका वेळी तीन तगडे पगार, पवन खेरांचे गंभीर आरोप

**नवी दिल्ली** : काँग्रेस पक्षाच्या मीडिया आणि प्रचार विभागाचे अध्यक्ष पवन खेरा यांनी पत्रकार परिषद घेऊन मोठा दावा केला आहे. काँग्रेसने म्हटले आहे की माधबी २०१७ ते २०२१ पर्यंत सेबीच्या पूर्णवेळ सदस्य आहेत आणि २०२२ मध्ये अध्यक्ष पदाची सूत्रे हाती घेतली. काँग्रेस प्रवक्ते पवन खेरा यांनी पत्रकारांना उद्देशून सांगितले की २०१७ ते २०२४ दरम्यान माधबी यांनी ICICI बँकेतून १६.८० कोटी रुपये पगार घेतल्याचा दावा केला आहे.त्यांनी म्हटले की या काळात माधबी सेबी आणि ICICI बँकेकडून पगार घेत राहिल्या असून काँग्रेसने या प्रकरणाला हितसंबंधांचा मुद्दा म्हटले. दरम्यान, काँग्रेसने केलेल्या या आरोपांवर मधबीकडून अद्याप कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही.

### सूर्यकुमार यादव पहिल्या सामन्यापूर्वीच स्पर्धेबाहेर

नवी दिल्ली : भारताला सूर्यकुमार यादवच्या रुपात आता मोठा धक्का बसला आहे. कारण पहिला सामना सुरु होण्यापूर्वीच आता सूर्यकुमार यादव हा स्पर्धेबाहेर गेला आहे. त्यामुळे बांगलादेशची मालिका सुरु होण्यापूर्वीच आता भारताला मोठा धक्का बसला आहे. कारण आता बांगलादेशची मालिका काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. त्यापूर्वीच सूर्यकुमार यादवबाबत ही मोठी बातमी आता समोर आली आहे. सूर्या हा मुंबईच्या संघाकडून बुचीबाबू क्रिकेट स्पर्धा खेळण्यासाठी मैदानात उतरला होता. पण हा सामना खेळत असताना त्याला दुखापत झाली होती. ही दुखापत किती गंभीर आहे, हे सुरुवातील समजले नव्हते. पण त्यासाठी सूर्याला राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये पाठवले होते.

### जिथे वेटर म्हणून काम तिथेच जाहीर सत्कार


नंदुरबार : घरची परिस्थिती बेताची. वडील अपघातानंतर दहा वर्षांपासून अंथरुणात खिळून. आई मोलमजुरी करून घराचा चरितार्थ चालवते. पैशांअभावी शिक्षण सोडावे लागले. मिळेल ते काम करताना उराशी बाळगलेलं स्वप्न पूर्ण करण्यासाठी तब्बल दहा वर्ष विविध कामं केली. नंदुरबार येथील नाट्य मंदिरात लग्नांमध्ये वेटरचं कामही केलं. अखेर यश प्राप्त झाल्यावर त्याच नाट्य मंदिरात हजारो लोकांसमोर सत्कार स्वीकारला. आकाशने सांगितेलाल अनुभव ऐकून अनेकांचे डोळे पाणावले.


ही गोष्ट एखादा चित्रपटाला साजेशी वाटते. मात्र चिकाटी व जिद्दीला गुरूंची साथ मिळाली तर यशाच्या शिखरावर पोहोचता येते, असाच अनुभव २९ वर्षीय आकाश कापुरे याला आला आहे. नंदुरबार पोलीस भरतीत त्याची निवड झाल्याने येथील शिवाजी नाट्य मंदिरात आयोजित कार्यक्रमात त्याचा सत्कार करण्यात आला.

# पॅरिस पॅरालिम्पिक: नितेश कुमारने बॅडमिंटनमध्ये सुवर्ण जिंकले, योगेश कथुनियाचे डिस्कस थ्रोमध्ये रौप्य

**पॅरिस/वृत्तसंस्था**

पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये भारताने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. नितेश कुमारने बॅडमिंटनमध्ये SL3 प्रकारात सुवर्णपदक जिंकले आहे. त्याने फायनलमध्ये ग्रेट ब्रिटनच्या डॅनियल बेथेलला २१-१४, १८-२१, २३-२१ असे पराभूत करत भारतासाठी ऐतिहासिक विजय मिळवला. या स्पर्धेत नितेशने अत्यंत उत्कृष्ट प्रदर्शन केले, विशेषतः तिसऱ्या गेममध्ये अंतिम क्षणांपर्यंत संघर्ष करत विजय मिळवला. यापूर्वी, योगेश कथुनियाने डिस्कस थ्रोमध्ये रौप्यपदक जिंकले. त्याने अंतिम फेरीत ४२.२२ मीटर फेक करून या स्पर्धेतील सर्वोत्तम थ्रो प्रदर्शित केले. हा थ्रो त्याच्या हंगामातील सर्वोत्तम आहे आणि यामुळे त्याने पॅरालिम्पिकमधील दुसऱ्या रौप्यपदकाचा मान मिळवला आहे. योगेशने २०२० च्या टोकियो ऑलिम्पिकमध्येही रौप्यपदक जिंकले होते, आणि त्याच्या या कामगिरीने भारतीय क्रीडापटूंना प्रेरणा दिली आहे. तसेच, पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये भारताने आतापर्यंत २ सुवर्ण, ३ रौप्य आणि ४ कांस्यपदकं मिळवली आहेत. आज भारताच्या प्रतिनिधींनी बॅडमिंटन, थलेटिक्स, नेमबाजी आणि तिरंदाजीमध्येही पदके जिंकण्याची शक्यता आहे.



बॅडमिंटनमध्ये नित्या श्रीशिवन आणि शिवराजन सोलैमलाई यांना मिश्र एसएच-६ स्पर्धेत कांस्यपदकासाठी पराभवाला सामोरे जावे लागले. त्यांनी इंडोनेशियाच्या सुभान आणि मर्लिनाबरोबरच्या सामन्यात २१-१७, २१-१२ असा पराभव स्वीकारला. पॅरालिम्पिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करताना पीएम मोदींनी अवनी लेखरा यांना शुभेच्छा दिल्या. मोदींनी अवनीशी फोनवर संवाद साधला आणि तिच्या कार्याची प्रशंसा केली. अवनी लेखरा हिने नेमबाजीमध्ये सुवर्णपदक जिंकून भारताला पहिले सुवर्णपदक मिळवून दिले होते. अवनी लेखरा आणि नितेश कुमार यांच्यासारख्या क्रीडापटूंनी भारताच्या मानाचा गजर लावला आहे. त्यांच्या या कामगिरीमुळे भारतीय पॅरालिम्पिक खेळाडूंना अधिक प्रोत्साहन मिळाल्याचे दिसून आले आहे. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीने भारताच्या खेळाडूंना जागतिक स्तरावर एक वेगळा स्थान मिळवून दिला आहे.

# पालकमंत्र्यांनी केले नाथसागर येथे जलपूजन



**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी**

पैठण येथील नाथसागर हे धरण ९० टक्के भरले असून या जलाशयाचे जलपूजन आज राज्याचे पणन,अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पालकमंत्र्यांनी अधिकाऱ्यांशी चर्चा करुन जलविसर्गाबाबत माहिती घेतली व त्यासंदर्भात काठावरील लोकांमध्ये आगाऊ सुचना देऊन खबरदारी बाळगण्याबाबत जनजागृती करण्याचे व आपत्ती व्यवस्थापन दलास सज्ज राहण्याचे निर्देशही दिले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, प्रांताधिकारी निलम बाफना, तहसिलदार सारंग चव्हाण, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंत प्रशांत जाधव, अधीक्षक अभियंता समाधान सबीनवार, उपविभागीय अभियंता रायबोले तसेच विलास भुमरे, किशोर अग्रवाल,आदी.

# सन २०२३ खरीप हंगामातील कापूस सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी खुशखबर!

**मुंबई/प्रतिनिधी**

सन २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना ४१९४.६८ कोटी रुपये अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे. या आर्थिक सहाय्याची थेट खात्यात जमा करण्याची प्रक्रिया १० सप्टेंबरपासून सुरू होणार आहे, अशी माहिती कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी दिली.कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दूरदृष्य प्रणालीवरील बैठकीत याबाबतचा निर्णय घेण्यात आला. बैठकीत कृषी विभागाच्या सचिव श्रीमती जयश्री भोज, कृषी आयुक्त रविंद्र बिनवडे, कृषी संचालक विजयकुमार आवटे, माहिती व तंत्रज्ञान विभागाचे अधिकारी आणि कृषी विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते. कृषी मंत्री मुंडे यांनी सांगितले की, २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्रदान केलेल्या अर्थसहाय्याची कार्यपद्धती ३० ऑगस्ट २०२४ रोजी जाहीर करण्यात आली आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी १५४८.३४ कोटी रुपये आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी २६४६.३४ कोटी रुपये असे एकूण ४१९४.६८ कोटी रुपये अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना ०.२ हेक्टरपेक्षा कमी क्षेत्रासाठी सरसकट १००० रुपये आणि ०.२ हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रासाठी प्रति हेक्टर ५००० रुपये (दोन हेक्टरच्या मर्यादेत) अर्थसहाय्य प्रदान केले जाईल. मागील वर्षी नैसर्गिक असमतोलामुळे उत्पादनात कमी झाल्याने तसेच दुष्काळामुळे कापूस आणि सोयाबीनच्या भावात घट झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. यावर उपाय म्हणून धनंजय मुंडे यांनी लोकसभा निवडणुकीपूर्वी या अर्थसहाय्याची घोषणा केली होती. आता, अर्थसंकल्पात यासाठी निधीची तरतूद करून येत्या १० सप्टेंबरपासून शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट निधी वर्ग करण्यास सुरुवात होणार आहे. या आर्थिक सहाय्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळण्यासोबतच त्यांना नुकसानभरपाईसाठी मदत होईल, असे कृषी मंत्री मुंडे यांनी सांगितले.

# उदय पेट्रोल पंप तोडफोड प्रकरणी आठ जणांवर गुन्हा दाखल

**कन्नड/प्रतिनिधी**

नागद बनोटी रोडवरील एका अपघातात एका महिलेचा मृत्यू झाल्यानंतर, जमावाने नागद येथील उदय पेट्रोल पंपावर तोडफोड केली. या प्रकरणी कन्नड ग्रामीण पोलीस ठाण्यात आठ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.३० ऑगस्ट रोजी, गणेश हरी राठोड आणि निलाबाई गणेश राठोड हे पती-पत्नी दुचाकीवरून नागद बनोटी रस्त्याने घराकडे जात होते. दरम्यान, आयशर वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली, ज्यामुळे निलाबाई गणेश राठोड यांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातानंतर,



स्थानिक जमावाने रास्ता रोको आंदोलन करत आठवडी बाजार बंद केला आणि रस्ता अरुंद आणि खड्डे असल्यामुळे अपघात झाला असे आरोप केले.जमावाने त्या दिवशी आमदार उदयसिंग राजपूत यांच्या नागद येथील उदय पेट्रोल पंपावर धाड घातली. पेट्रोल पंप बंद करून, पंप व्यवस्थापक आणि कर्मचारी यांना शिवीगाळ करत धक्काबुक्की केली. यानंतर, पंपावर असलेल्या सामानाची नासधूस करत, जिवे मारण्याची धमकी देत साठ ते सत्तर हजार रुपये चोरीस घेतले.पेट्रोल पंप व्यवस्थापक दगडू दामु पाटील यांनी कन्नड ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यावर, हरिश मुमनावत (राहणार हनुमंतखेडा ता. सोयगांव), दयाराम राठोड, संजय चव्हाण, विठ्ठल राठोड, राहुल राठोड, युवराज धर्मराज पवार (सर्व नागद तांडा ता. कन्नड), रामराव ओंकार चव्हाण, आणि मोतिलाल चव्हाण (राहणार बेलखेडा तांडा ता. कन्नड) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.उपविभागीय पोलीस अधिकारी विजयकुमार ठाकूरवाड आणि सहाय्यक पोलिस निरीक्षक रामचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक अमोल जाधव या प्रकरणाच्या पुढील तपास करत आहेत. गुन्हेगारांना पकडण्यासाठी आणि न्याय मिळवण्यासाठी पोलिसांची तपास प्रक्रिया सुरू आहे. यामध्ये, उदय पेट्रोल पंपावर झालेली तोडफोड आणि चोरीचे गंभीर परिणाम स्थानिक समुदायावर झाले असून, संबंधित आरोपींविरुद्ध कठोर कारवाईची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# संघ शक्ती उभी करणे हेच महत्वाचे आहे: डॉ.ऋषिकेश कांबळे

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

भारतीय दलित पँथरच्या वतीने आयोजित आरक्षण हक्क परिषदेत प्रख्यात विचारवंत आणि आंबेडकरी विचाराचे अभ्यासक प्राध्यापक डॉ. ऋषिकेश कांबळे यांनी संघटित होऊन संघर्षासाठी सज्ज होण्यावर जोर दिला. या परिषदेच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र प्रदेश दलितांचे अध्यक्ष रमेश भाई खंडागळे होते, तर प्रमुख वक्ते म्हणून प्राचार्य प्रमोद हिरोडे यांची उपस्थिती होती. प्रमुख पाहुण्यांमध्ये शिवाजी आदमाने, प्राध्यापक भगवान धांडे, संजय भाऊ कांबळे, प्रा. मोहन सौंदर्य, प्रा. समाधान धांडे आणि ओमपाल चावरिया यांचा समावेश होता. डॉ. कांबळे यांनी बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची दखल घेत, संघटित होणे आणि संघर्षासाठी सज्ज होणे आवश्यक आहे असे स्पष्ट




केले. त्यांनी पुढील लढ्याच्या दिशेचा ठराव करण्यासाठी बाबासाहेबांचा संघर्ष विचार विचारात घेणे आवश्यक असल्याचे सांगितले. प्राचार्य प्रमोद हिरोडे यांनी आरक्षणाच्या बाबतीत सविस्तर चर्चा करून, सुप्रीम कोर्टाच्या निर्णयामुळे मागासवर्गीयांच्या प्रगतीवर मोठा अडथळा येऊ शकतो असा इशारा दिला. त्यांनी सांगितले की, या निर्णयाने पंजाब आणि हरियाणामध्ये लागू होणारा निर्णय अन्य राज्यांवर अमलात आणण्याची नैतिक जबाबदारी राज्य सरकारवर आहे.

त्याचप्रमाणे,हा निर्णय पुनरावलोकन करण्यासाठी दबाव टाकणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. प्राध्यापक भगवान धांडे, समाधान धांडे आणि प्रमुख पाहुणे संजय भाऊ कांबळे यांनीही संघर्षासाठी सर्व शक्ती उभारण्याचे आवाहन केले. ज्येष्ठ पत्रकार स. सो. खंडाळकर यांनी संपूर्ण आरक्षण वाद्यांना एकत्र येऊन संघर्ष यशस्वी करण्याचे आव्हान केले. अध्यक्ष रमेशभाई खंडागळे यांनी कार्यक्रमाच्या समारोपात एक ठराव मांडला, ज्यात सुप्रीम कोर्टाने निर्णयाचा फेरविचार किंवा केंद्र सरकारने संसदेत बदल करावा, अन्यथा रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल असे म्हटले. या ठरावास कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्तपणे समर्थन दिले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नितेश तांगडे, कडूबा मस्के, संतोष खिल्लारे, अजय बोर्डे, अनिल हातागळे, देविदास वाघमारे, उमेश गायकवाड, गणेश शिवराळे, दादाराव आढाव, सोमीनाथ कसारे, सतीश मोकळे, महिला आघाडीच्या सुभद्राताई नवगिरे, उषा खंडाळे, रेखा भुईगळ यांचे योगदान महत्वाचे ठरले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ड दिशा खंडाळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन गणेश चव्हाण यांनी केले.

# अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत करावी सुरेश पवार यांची प्रशासनाकडे मागणी

**मंठा/प्रतिनिधी**

मागील दोन दिवसात पावसाने मंठा तालुक्यात थैमान घातले असुन शेतकर्यांच्या हातातोंडाशी आलेला घास या पावसाने हिरावुन घेतला असुन तालुक्यातील नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रु सरसगट तात्काळ आर्थिक मदत करावी अशी मागणी सामाजीक कार्यकर्ते सुरेश पवार यांनी केली आहे.मंठा तालुक्यातील खरीप पिकांची झालेली वातहात बाबतची माहिती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांची भेट घेऊन सांगितले आहे.या वेळी श्री पवार यांनी शेतकरी हा अशिक्षीत असल्यामुळे ई पीक पाहणीचा ऑनलाईनचा ससेमिरा न लावता पिक विमा कंपनी व महसुल विभागाच्या अधिकार्यांनी प्रत्येक गावात जाऊन चावडीवर किंवा मंदीरावर बसुन ऑनलाईनची प्रक्रिया करून घ्यावी या साठी शासनाकडे आग्रह करण्याची विनंती केली आहे.

सध्या मंठा तालुक्यात परतीच्या पावसाने धुमाकूळ माजविला असुन कापुस, सोयाबीन,हळद,तूर या पिकांचा फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.त्या मुळे शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक दिलासा देण्याची गरज असुन त्यांना तात्काळ मदत द्यावी अशी मागणी श्री पवार यांनी केली आहे.

**नुकसानीचा तात्काळ आढावा सादर**

मंठा तालुक्यासह शहरात ढगफुटीसदृष पाऊस झाल्यामुळे तालुक्यासह शहरात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असुन या नुकसानीचा सुरेश पवार यांनी आढावा घेऊन नानाभाऊ पटोले यांच्यासह प्रशासनातील संबंधींतांना अहवाल सादर करून तात्काळ उपाययोजनेची मागणी त्यांनी केली आहे.मागील पाच ते सहा वर्षापासुन शेतकरी राजा अनेक निसर्ग संकटाला तोंड देत आहे. त्यामुळे आर्थिक संकटात सापडला आहे. काल झालेल्या पावसामुळे तोंडचा आलेला सोयाबीन, कापुस यासह विविध पिके पावसामुळे भिजून नासाडी झाली आहे.

कोणतेही पिक शेतकर्यांच्या हाती आले नसुन सरकारने शेतकर्यांना नुकसान भरपाई स्वरूपात आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सुरेश पवार यांनी केली आहे.

### श्रीराम फायनान्स गोल्ड लोनसाठी 'जितक्या मुदतीसाठी कर्ज

पुणे: श्रीराम फायनान्स लिमिटेडने महाराष्ट्रात गोल्ड लोनसाठी 'जितक्या मुदतीसाठी कर्ज, तितक्याच दिवसांचे व्याज' हा नवीन उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाद्वारे ग्राहकांना सणासुदीच्या काळात सहजपणे निधी उपलब्ध करून दिला जाईल. श्रीराम फायनान्स त्यांच्या २८१ शाखांपैकी १०५ शाखांमध्ये गोल्ड लोन वितरित करीत आहे आणि आगामी वित्तीय वर्षाच्या पहिल्या तिमाहीत ₹ २३,९१८.७२ कोटींच्या कर्ज वितरणामध्ये ₹ १,०५५.७४ कोटी गोल्ड लोनचे आहे. या उपक्रमाच्या अंतर्गत, शाखांमधील पायाभूत सुविधा सुधारण्याकरिता गुंतवणूक केली जाईल. श्रीराम फायनान्सच्या विपणन कार्यकारी संचालक, सुश्री एलिझाबेथ वेंकटरामन यांनी ग्राहकांच्या सोयीसाठी हा उपक्रम अत्यंत फायदेशीर ठरेल असे म्हटले आहे.

# शासकीय सेवेत लागलेल्या मुला-मुलींचा उद्योजक मनोज पवार यांच्या हस्ते सत्कार

**कन्नड /प्रतिनिधी**

शासकीय सेवेत नोकरी मिळविल्याबदल तसेच आपल्या कष्टकरी आई वडीलांची स्वप्नन पुर्ण करुन आकाशाला गवसणी घालणाऱ्या यशवंत विद्यार्थी व पालकांचा भव्य सत्कार उद्योजक मनोज पवार आणि उद्योजिका उर्मिलाताई पवार यांच्या हस्ते शहरातील पिशोर नाका येथील उद्योजक मनोज पवार यांच्या जनसंपर्क कार्यालयात संपन्न झाला. दिनांक १ सप्टेंबर रोजी केशवपुष्प उद्योग समुहाचे सर्वेसर्वा उद्योजक तथा समाजसेवक मनोज पुष्पाबाई केशवराव पवार आणि उद्योजिका तथा समाजसेविका सौ.उर्मिलाताई मनोज पवार यांच्या तर्फे २०२४ साली नवनियुक्त यशवंत विद्यार्थ्यांचा भव्य गुणगौरव व सत्कार सोहळ्याचे आयोजित करण्यात आला होता. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांत पोलीस प्रशासनात शासकीय सेवेत लागलेल्या तालुक्यातील अमृता पुणे, फरीन शेख , समिक्षा बनसोडे, मनिषा जंगले, कावेरी वेताळ, कल्याणी चव्हाण, तेजस्विनी गायके, ज्ञानेश्वर जाधव, सुरेश पवार, राजेंद्र




पवार, अनिल ढेपले, विश्वजित गौर ,मकसुद पठाण,आकाश कटके , विशाल सोनवणे या यशवंत विद्यार्थीसह त्यांच्या पालकांचा शाल श्रीफळ स्मृतिचिन्ह देऊन उद्योजक मनोज पवार व उद्योजिका उर्मिलाताई पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी व्यासपीठावर उद्योजक मनोज पवार, उद्योजिका उर्मिलाताई पवार, के.के.भुतेकर, प्रा.डॉ. संजय गायकवाड, प्रा. रंगनाथजी लहाणे , मुख्याध्यापक भगवान ठाकरे , श्री.किसन काकरवाल , श्री.जालिंदर गायके , यासह आदी मान्यवरांची व्यासपीठावर उपस्थित होती.भव्य गुणगौरव व सत्कार सोहळा साजरा करण्यासाठी उद्योजक मनोज पवार यांच्याकडे साई इम्पॅक्ट करिअर अॅकॅडमी च्या वतीने जागेची मागणी करण्यात आली होती. ावेळी उद्योजक मनोज पवार यांनी कुठलाही विचार न करता सोहळा समितीला सांगितले की जागा पण देतो आणि मीच आयोजन करतो आणि जवळपास सोहळ्यासाठी उपस्थित तरुणांसह त्यांच्या पालकांना भोजनाची व्यवस्था ही उद्योजक मनोज पवार यांनी या ठिकाणी ठेवली होती.

सदरचा हा सोहळा उद्योजक मनोज पवार यांनी ठेवल्याबद्दल यशवंत विद्यार्थी सह पालकांनी उद्योजक मनोज पवार व उद्योजिका उर्मिलाताई पवार यांचे तोंड भरून कौतुक केले. या कार्यक्रमास विद्यार्थी,पालक , यांच्या सह मनोज भाऊ मित्र मंडळाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

### कॉन्कॉर्ड एन्व्हायरो सिस्टम्सकडून सेबीकडे नव्याने कागदपत्रे दाखल

छत्रपती संभाजीनगर- कॉन्कॉर्ड एन्व्हायरो सिस्टम्स या पर्यावरणीय अभियांत्रिकी सोल्यूशन्स फर्मने निधी उभारणीसाठी इनिशियल पब्लिक ऑफरिंग (आयपीओ) द्वारे सेबीकडे नवीन प्राथमिक कागदपत्रे सादर केली आहेत. दाखल केलेल्या ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस (डीआरएचपी) नुसार प्रस्तावित आयपीओमध्ये १९२.३ कोटी रुपयांचे नवीन इक्विटी शेअर्स जारी करणे आणि प्रवर्तक आणि गुंतवणूकदारांद्वारे ५१.९४ लाख इक्विटी शेअर्सची ऑफर फॉर सेल (ओएफएस) यांचा समावेश आहे.

MAHATMA GANDHI MISSION

MAHATMA GANDHI MISSION
NANASAHEB KADAM COLLEGE OF AGRICULTURE
GANDHELI, AURANGABAD
(Affiliated to Vasantrao Naik Marathwada Krishi Vidyapeeth, Parbhani)
Phone: 8530647878, Email : mgmagrigandheli12@gmail.com Website : mgmnkca.org

Date: 03-09-2024

Vacancy for Admission Management quota 2024-25
Course B. Sc. (Hons) Agriculture

MGM Nanasaheb Kadam College of Agriculture, Gandheli, Aurangabad invites the applications for admission to our undergraduate B. Sc. (Hons) Agriculture Degree Course for the academic year 2024-25 from 04-09-2024 to 07-09-2024 upto 06:00 PM.

**Eligibility Criteria for Admission :** As per MCAER Prospectus 2024-25

**Vacancy for Management Quota Admissions :** 06 Seats

**How to apply :** Visit our website www.MGMNKCA.org and Download the application form fill it properly and submit to college.

**Contact Person Admission Incharge :** Mr. P.B.Chopade: 9373434917

**Website :** www.mgmnkca.org

**Paringipal**
**MGM Nanasaheb Kadam College of Agriculture**
Gandheli Chhatrapati Sambhajinagar